गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ३६ वा ● गुरुवार २२ जून २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 36 | Date : 22/06/2023 | blow : Thursday | Page 4 | Price 4

वसुधैव कुटुंबकमसाठी हजारोच्या संख्येने सोलापूरकरांनी केला योग

प्राचीन भारतीय योग शास्त्राला दैनंदिन जीवनाचा भाग बनवा : प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांचे आवाहन

सोलापूर/प्रतिनिधी : योग हा ध्यान आणि व्यायामापुरतता मर्यादित नसून अध्यात्माच्या सर्व प्रकारच्या शक्यतांची ओळख करून देणारे अत्यंत प्राचीन असे शास्त्र आहे. भारताला याचा अत्यंत समृद्ध वारसा लाभला आहे. योगाच्या परंपरेचे संवर्धन आणि जतन केले पाहिजे, योगाला आपल्या दैनंदिन जिवनाचा अविभाज्य भाग बनवा असे, आवाहन प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी आज येथे नवव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमात केले.सोलापूरातील हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्युरो, सोलापूर, जिल्हा व पोलीस प्रशासन आणि योग्य समन्वय समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात प्रभारी जिल्हाधिकारी ठोंबरे बोलत होते. वसुधैव कुटुंबकमसाठी योग ही यावर्षीची योग दिनाची संकल्पना आहे.

खासदार डॉ जयसिद्धेश्वर महास्वामी यांच्या हस्ते योग दिनाच्या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलनने उद्घाटन करण्यात आले. यावेळी त्यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या उपस्थिताना शुभेच्छा दिल्या.यावेळी व्यासपीठावर पोलीस आयुक्त राजेंद्र माने, महानगरपालिका आयुक्त शीतल तेली-उगले, क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण, राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक नितीन धार्मिक, जिल्हा क्रीडा अधिकारी नितीन तारळकर, शिक्षणाधिकारी सुलभा वठारे, महाव्यवस्थापक विनोद तावरे, ज्येष्ठ संपादक अभय दिवाणजी, ह.दे.प्रशालेचे प्राचार्य प्रकाश कांबळे, योग संस्था निमंत्रक मनमोहन भुतडा, मुख्य समन्वयक सुधा अळळीमोरे, एन.सी.सी. बटालियन ३८ चे सुभेदार मेजर अरुणकुमार ठाकूर, अजितकुमार, सेवानिवृत्त अधिकारी । पान २ वर

लाखो वारकऱ्यांना दिलासा

वारकऱ्यांना आता शासनातर्फे विमा संरक्षण

वारकऱ्यांसाठी 'विठ्ठल रुक्मिणी वारकरी विमा छत्र योजना' लागू

मुंबई : पंढरपूरच्या आषाढी वारीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांसाठी शासनातर्फे विमा संरक्षण देणारी 'विठ्ठल रुक्मिणी वारकरी विमा छत्र योजना' लागू करण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे. लाखो वारकऱ्यांना यामुळे शासनाच्या खर्चाने विमा संरक्षण मिळणार आहे. वारीच्या ३० दिवसांसाठी हे विमा संरक्षण असेल.यामध्ये एखाद्या वारकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांस ५ लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्यात येईल. दुर्घटनेत कायमचे अपंगत्व किंवा विकलांगता आल्यास १ लाख रुपये देण्यात येतील. अंशत: अपंगत्व आल्यास ५० हजार रुपये तसेच वारीच्या दरम्यान आजारी पडल्यास औषधोपचारासाठी ३५ हजार रुपयापर्यंतचा खर्च मिळेल. याबाबत शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला असून मदत व पुनर्वसन विभागामार्फत ही योजना राबविण्यात येईल.

वारीच्या दरम्यान अपघात किंवा दुर्घटना होतात आणि त्यात वारकरी जखमी होतात किंवा त्यांचा दुर्दैवी मृत्यू होतो. यामध्ये त्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळावी या उद्देशाने मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी हा निर्णय घेतला आहे

दिलासादायक..! उद्यापासून राज्यात पावसाचा अंदाज, २४ जूनपासून जोर वाढणार

मुंबई : राज्यातील वातावरणात सतत बदल होत आहे. काही भागात उन्हाचा तडाखा जाणावत आहे तर काही भागात ढगाळ वातावरण आहे. दरम्यान, हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार उद्यापासून (२३ जून) राज्यातील काही भागात पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. कोकणातील काही भागासह मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात पावसाची शक्यता आहे. तर २४ आणि २५ जूनपासून पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. तर मराठवाडा मधील काही भागात मेघ गर्जनेसह पावसाची शक्यता आहे.

मोसमी पावसाचे आगमन लांबल्याने राज्यातील खरीप हंगाम अडचणीत आल्याचं चित्र आहे. बळीराजा आकाशाकडे डोळे लावून बसला आहे. काही भागात धूळवाफ पेरण्या झाल्या आहे, त्या ठिकाणी आता पुन्हा एकदा दुबार पेरणीचे सावट निर्माण झाले आहे. त्यामुळं शेतकऱ्यांच्या चिंतेत आणखी भर पडली आहे. मात्र, उद्यापासून राज्यात पावसाची शक्यता वर्तवण्यात आला आहे.

जून महिना सुरु होताच अनेक शेतकरी बी-बियाणे खरेदी करण्यास सुरवात करतात. यावेळी देखील मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी केली आहे. पण असे असलं तरीही पेरणीयोग्य पाऊस झाल्याशिवाय पेरणी करु नयेत असे। पान २ वर

१५ ते २४ जानेवारी २०२४ दरम्यान श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा

अयोध्या : अयोध्येतील राम मंदिर जनतेसाठी कधी खुलं होणार याबाबत अनेक तर्कवितर्क लढवले जात आहेत. त्यातच आता अयोध्येतील राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठेची तारीख जाहीर झाली आहे. राम मंदिर निर्माण समितीचे अध्यक्ष नृपेंद्र मिश्रा यांनी एबीपी न्यूजला सांगितलं की, १५ जानेवारी २०२४ ते २४ जानेवारी २०२४ दरम्यान राम मंदिरात श्रीरामाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना होऊ शकते. प्राणप्रतिष्ठेच्या शेवटच्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निमंत्रण पाठवलं जाईल, असं नृपेंद्र मिश्रा यांनी सांगितलं. प्राणप्रतिष्ठेनंतर राम मंदिराचे दरवाजे भाविकांसाठी खुले केले जातील, असंही ते म्हणाले. मिश्रा पुढे म्हणाले की, । पान २ वर

मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचार! गाडीमध्ये बॉम्बस्फोट, ३ जण जखमी

मणिपूर : भारताच्या ईशान्येकडील मणिपूर राज्यात हिंसाचार थांबण्याचं नाव घेत नाही. मणिपूरमध्ये एका कारमध्ये बॉम्बस्फोट झाला आहे. मणिपूरच्या बिष्णुपूर जिल्ह्यातील क्वाक्ता येथे एका पुलाजवळ उभ्या असलेल्या एसयूव्हीमध्ये बॉम्बस्फोट झाला, यामुळे तीन नागरिक जखमी झाले आहेत. पीटीआय वृत्तसंस्थेने सुत्रांच्या हवाल्याने ही माहिती दिली आहे.

त्यानुसार, कारमध्ये एक बॉम्ब ठेवण्यात आला होता, ड्रायव्हर कारमधून खाली उतरताना याचा स्फोट झाला असावा, असा अंदाज आहे. यावेळी गाडीजवळ उभे तीन जण जखमी झाले. बुधवारी, २१ जून रोजी ही घटना घडली. या अपघातातील सर्व जखमींना बिष्णुपूर जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमींपैकी एकाची प्रकृती गंभीर आहे. मणिपूर राज्यात सतत हिंसाचार सुरू आहे. मणिपूरमध्ये ३ मे रोजी सुरू झालेल्या जातीय हिंसाचारात आतापर्यंत १०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. हजारो लोकांना आपली घरे सोडून मदत छावण्यांमध्ये वास्तव्य करावं लागत आहे. मणिपूरमध्ये अधूनमधून गोळीबारही सुरू आहे. मणिपूरमध्ये जवळपास ५० दिवसांपासून शांतता प्रस्थापित करण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू आहेत.

पण हिंसाचाराच्या घटना थांबत नाहीत.पोलीस अधिकार्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री ८.३० ते ९.३० वाजेदरम्यान गेल्जंग आणि सिंगडा येथे मधूनमधून चार ते पाच गोळ्या झाडण्यात आल्या. मात्र, हा गोळीबार कोणालाही उद्देशून नव्हता, तर हवेत फायरिंग करण्यात आल्याची माहिती आहे.

याशिवाय कांगचुप सेक्टरमधील गेल्झांग आणि सिंगडा येथूनही अधूनमधून गोळीबार सुरू असल्याची माहिती समोर येत आहे.

भारताचा पाकिस्तानवर दणदणीत विजय, सुनील छेत्री ठरला शिल्पकार

बेंगलोर : सुनील छेत्रीच्या दमदार प्रदर्शनाच्या जोरावर भारताने फुटबॉलच्या मैदानात पाकिस्तानला आस्मान दाखवले. बेंगलोरमध्ये झालेल्या सामन्यात भारताने पाकिस्तानचा ४-० च्या फरकाने पराभव केला. सैफ चॅम्पियनशीप स्पर्धेला आजपासून सुरुवात झाली. भारताचा पहिला सामना पाकिस्तानसोबत होता.. या सामन्यात भारतीय कर्णधार सुनील छेत्री याने प्रभावी कामगिरी करत विजयात मोठी भूमिका पार पाडली.

दक्षिण आशियाई फुटबॉल फेडरेशन चॅम्पियनशिप २०२३ स्पर्धेला आजपासून सुरुवात झाली. बेंगलोरमधील के श्री कांतीरावा स्टेडियममध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातील फुटबॉल सामना रंगला. सैफ चॅम्पियनशिप स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान एकाच ग्रुपमध्ये आहेत. आज झालेल्या सामन्यात भारताने पाकिस्तानवर विजय मिळवला. भारतासाठी कर्णधार सुनील छेत्री या दमदार कामगिरी केली. छेत्रीने सलग तीन गोल केले. त्याशिवाय उदांता सिंह याने सामन्याच्या । पान २ वर

श्री संत गजानन महाराज पालखी सोहळ्याचे सोलापूर जिल्ह्यात आगमन

उळे येथे प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी केले स्वागत

सोलापूर/प्रतिनिधी : गण गण गणात बोते, गजानन माऊली आणि विठू नामाचा जयघोष करीत शेगावच्या श्री संत गजानन महाराज पालखी सोहळ्याचे आज बुधवार दिनांक २१ जून २०२३ रोजी सायंकाळी सोलापूर जिल्ह्यात आगमन झाले. उळे (ता. दक्षिण सोलापूर) येथे जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी दर्शन घेऊन पालखीचे व वारकऱ्यांचे भक्तिभावात स्वागत केले.यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी सहकुटुंब दर्शन घेऊन पालखीचे व वारकऱ्यांचे स्वागत केले.

तसेच माजी मंत्री सिद्धराम म्हेत्रे, सहायक जिल्हाधिकारी मनीषा आव्हाळे, उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुने, तहसीलदार राजशेखर लिंबारे, तहसीलदार उत्तर सैपन नदाफ, गटविकास अधिकारी बाळासाहेब वाघ, पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे यांनीही पालखीचे दर्शन घेतले.

पालखीच्या स्वागतासाठी नायब तहसीलदार शुभांगी जाधव, दत्तात्रय गायकवाड, आप्पा धनके, सुरेश हसापुरे, धनेश अचलारे, सरपंच श्री. डांगे, मंडल अधिकारी जगदेवप्पा धनुरे, तलाठी समाधान काळे, ग्रामसेवक श्री. पठाण, विस्तार अधिकारी श्री. कमळे, मुख्याध्यापक लिंबराज जाधव, सोनाली इंजेवाड, मनोज गुंड, दत्ता खंडागळे, सचिन शिंदे, पोलीस पाटील पांडुरंग कुंभार यांनी परिश्रम घेतले. पालखीचा मुक्काम आज उळे (ता. दक्षिण सोलापूर) येथे असून पालखी सोहळा गुरुवार दिनांक २२ जून रोजी सकाळी सोलापूर शहरात प्रवेश करणार आहे.

भरडधान्य बियाणांचा जिल्ह्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा

जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने

सोलापूर/प्रतिनिधी: संयुक्त राष्ट्रसंघाने २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून घोषित केले आहे. या पार्श्वभूमिवर जिल्ह्यात शेत तिथे पौष्टिक तृणधान्य मोहिमेंतर्गत पौष्टिक तृणधान्य पिकांचे क्षेत्र व उत्पादन वाढीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सुधारित बियाण्याचे मिनीकिट आधारित बियाणे उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या मिनीकिट भरडधान्य बियाणांचा अधिकाधिक शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

पत्रकात म्हटले आहे, सन २०२३ हे वर्ष जागतिक स्तरावर आंतरराष्ट्रीय पौष्टिक धान्य वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. पौष्टिक तृणधान्य वर्ष या संकल्पने अंतर्गत ज्वारी, बाजरी, नाचणी, कोडो, राळा, राजगिरा इत्यादी पौष्टिक तृणधान्य पिकांच्या उत्पादन वाढीबरोबरच या पिकांच्या आरोग्यविषयक फायद्याबाबत जनजागृती करून लोकांच्या आहारातील पौष्टिक तृणधान्यांचे प्रमाण वाढविणे तसेच तृणधान्य पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ। पान २ वर

टाळ-मृदंगाचा गजर आणि मुखी गजानन महाराजांसोबत संतांचे भजन-कीर्तन करत भक्तिमय वातावरणात आज शेगावच्या श्री गजानन महाराजांचा पालखी सोहळ्याचे सोलापूर जिल्ह्यात आगमन झाले सर्व प्रथम अक्कलकोट विधानसभेत आगमन झाल्यावर अक्कलकोट विधानसभा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी सहपरिवार स्वागत करून पूजा केले प्रसंगी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पदाधिकारी व शासकीय अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

* सुविचार *

माणसाचे प्रेम हे धरती सारखे असते अगोदर एक दाणा पेरावा लागतो.

संपादकीय

हे खरेच दुर्दैवी आहे.

ठाकरे व शिंदे गटाकडून शिवसेनेचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या वेगवेगळ्या सोहळ्यात दोन्ही गटाकडून शक्तिप्रदर्शन करण्यात आले. खरी शिवसेना आमचीच हे शिवसैनिकांना आणि लोकांना दाखवून देण्याचा आटोकाट प्रयत्न करण्यात आला. कारण आता दोन्ही बाजूंच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. दोन्ही बाजूंचे नेते म्हणत आहेत की, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेली खरी शिवसेना ही आमचीच आहे. ज्यांनी शिवसेनेत बंड केले ते एकनाथ शिंदे म्हणत आहेत की, बाळासाहेब यांच्या विचारांचे खरे वारसदार आम्ही आहोत, माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे हे जरी बाळासाहेबांचे पुत्र असले तरी त्यांनी बाळासाहेबांच्या विचारांशी प्रतारणा केलेली आहे. त्यांनी मुख्यमंत्रिपदासाठी काँग्रेस, राष्ट्रवादीशी हातमिळवणी केलेली आहे, तर दुसऱ्या बाजूला उध्दव म्हणत आहेत की, जरी तुम्ही पक्षाचे नाव आणि चिन्ह पळवले असले तरी ठाकरे नाव पळवू शकणार नाही, त्यामुळे खरी शिवसेना आमचीच आहे हे वेगळे सिध्द करण्याची गरज नाही. अशा सगळ्या पेचात सध्या मराठी माणसांच्या न्याय्य हक्कांसाठी स्थापन झालेला शिवसेना हा पक्ष सापडला आहे, त्यामुळे नेमके बाळासाहेब सांगा कुणाचे, अशी सध्या परिस्थिती निर्माण झालेली आहे. राज ठाकरे हे शिवसेनेतून बाहेर पडून त्यांनी वेगळा पक्ष स्थापन केल्यावर मूळ शिवसेनेतील अनेकांची अवस्था कोणता झेंडा घेऊ हाती अशी झाली होती. एकनाथ शिंदे यांनी पक्षातून बाहेर न पडता आमदार, खासदारांची मोठी संख्या माझ्याकडे असल्यामुळे आम्हीच खरे बाळासाहेबांचे वारसदार आहोत, असा दावा केला आहे. शिंदे यांच्या बंडामुळे शिवसेनेतील एकूणच अस्वस्थतेला वाव मिळाला आणि अनेक लोक शिंदे यांच्या छत्राखाली आले. आता शिंदे यांच्या छत्राखाली आलेल्यांचा पुढचा प्रवास वाटतो तितका सोपा नाही, हे नुकत्याच केवळ मोदीशिंदे यांच्या प्रसिध्द झालेल्या जाहिरातीवरून दिसून आलेले आहे. खरी शिवसेना आपलीच असे म्हणून ठाकरे आणि शिंदे दोन्ही बाजू सर्वशक्ती पणाला लावून खेचाखेची करत आहेत. त्यातून संघटनेची शकले उडत आहेत. बाळासाहेब ठाकरेंचे की शिंदेंचे असा प्रश्न नेत्यांनी उभा करून ठेवल्यामुळे संपूर्ण राज्यभरातील सर्वसामान्य शिवसैनिक आणि पदाधिकारी संभ्रमित झालेले आहेत. सामान्य मराठी माणसासाठी स्थापन झालेल्या शिवसेनेची अशी अवस्था होणे हे खरेच दुर्दैवी आहे.

दीड कोटी पशुधनाचे मोफत लसीकरण करणारे महाराष्ट्र देशातील एकमेव राज्य

पशुधन हिताय, बहुजन सुखाय ब्रीद' जपत शेतकरी, पशुपालकांसाठी काम करणारे हे शासन आहे. पशुधन' हा शेतीला पूरक असा व्यवसाय आहे. पशुधन वाढले पाहिजे, जोपासले पाहिजे, यासाठी या विभागामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. पशुधनाच्या लम्पी आजारांवरील मोफत लसीकरणासाठी शासनाने तातडीने निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे राज्यात दीड कोटी पशुधनाचे कमी कालावधीत विक्रमी मोफत लसीकरण व उपचार करण्यात आले. पशुधन गमावलेल्या शेतकऱ्यांना आतापर्यंत ८९ कोटी रुपयांची मदत करण्यात आली आहे. शंभर टक्के लसीकरण व सर्वाधिक मदत देणाऱ्या राज्यात महाराष्ट्र राज्य देशातील एकमेव राज्य ठरले.

पशुधनाच्या लसीच्या निर्मितीत स्वयंपूर्ण होण्यासाठी पुण्यात ७० कोटी रूपये खर्चून प्रयोगशाळा उभारण्यात आली असून सप्टेंबर २०२३ पासून प्रत्यक्ष लसीच्या उत्पादनाला सुरूवात होणार आहे. यामुळे महाराष्ट्र देशाला लस पुरविणार आहे. 'लम्पी नियंत्रणासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला. सप्टेंबर २०२३ पर्यंत 'लम्पी' लस निर्मिती करणारे महाराष्ट्र पहिले राज्य ठरणार आहे.

अहमदनगर येथे होणार नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय

भारतीय पशुचिकित्सा परिषद, नवी दिल्ली यांच्या शिफारशी नुसार विद्यापीठ तसेच महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठा अंतर्गत अधिनस्त महाविद्यालयांमध्ये इमारतींचे बांधकाम व अन्य मुलभुत सुविधांचा विस्तार आणि आस्थापनेकरीता महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठाची स्थापना/ बळकटीकरण या योजनेंतर्गत निधी अर्थसंकल्पीत करण्यात येतो. सदर योजनेंतर्गत बळकटीकरण व नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयाची अहमदनगर येथे स्थापना करण्यासाठी चालू आर्थिक वर्षात ४५ कोटी अर्थसंकल्पित असून सन २०२३-२४ करिता ४५ कोटी रुपये अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

अकोला येथे नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालयाची स्थापना

अकोला येथे नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या महाविद्यालयाकरीता शिक्षक संवर्गातील ५६, शिक्षकेत्तर संवर्गातील ४८ आणि बाह्यस्त्रोताद्वारे ६० अशी एकूण १६४ पदे नव्याने निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

महापशुधन एक्स्पो

नुकतेच शिर्डी येथे 'महापशुधन एक्स्पो मध्ये ३०० स्टॉलची उभारणी करण्यात आली आहे. विविध प्रजातीचे पशुधन या 'महापशुधन एक्सपो' मध्ये सहभागी झाले होते. या एक्स्पोला तीन दिवसांत ८ लाख लोकांनी दिली भेट दिली होती. 'महापशुधन एक्स्पो' च्या माध्यमातून शेतकऱ्यांना शास्त्रीय पध्दतीने शेती व पशुपालन करण्याचे ज्ञान मिळण्यास मदत झाली.

दूध भेसळ रोखण्यासाठी राज्य शासनामार्फत कडक कारवाई

राज्यात दूध भेसळीची समस्या अत्यंत गंभीर झाली आहे. येणाऱ्या काळात दूध भेसळ रोखण्यासाठी एक हेल्पलाईन तयार करण्यात येईल जेणकरुन या हेल्पलाईनवर ग्राहकांना दूध भेसळीबाबत तक्रार करता येईल. एक विशेष अभ्यासगट तयार करुन यामध्ये ग्रामीण भागातील प्रतिनिधी आणि या क्षेत्रातील तज्ञ घेऊन सहकारी दूध संघांना बळकटी देण्यासाठी काय करता येईल याबाबत अभ्यास करण्यात येईल.

महाराष्ट्र गो-सेवा आयोगाची स्थापना

देशी गो-वंशाचे संवर्धन, संगोपन व संरक्षणासाठी महाराष्ट्र गो-सेवा आयोगाची स्थापना ही ऐतिहासीक बाब म्हणावी लागेल. या आयोगाच्या माध्यमातून गोवर्धन, गोवंश सेवा केंद्र योजना, गोमय मुल्यवर्धन योजना व देशी गोवंशांच्या संवर्धनासाठी भ्रृणब्राह्य फलन व प्रत्यारोपन सुरक्षेत वाढ करताना विदर्भ, मराठवाड्यातील ११ जिल्हे दूध विकासाच्या दुस-या टप्प्यासाठी १६० कोटी रुपयांच्या तरतुदीमुळे या सर्व जिल्ह्यांमध्ये दूध व्यवसाय विकासास चालना मिळणार आहे.

गोशाळांना अनुदान (गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना)

राज्यातील ३२४ तालुक्यांमध्ये सदर योजना राबविण्यात येणार आहे. प्रत्येक तालुक्यातील एका गोशाळेला या योजनेद्वारे अनुदान देण्यात येणारआहे.५० ते १०० पशुधन असणाऱ्या



गोशाळेस १५ लाख रुपये, १०१ ते २०० पशुधन असणाऱ्या गोशाळेस २० लाख रुपये आणि २०० पेक्षा जास्त पशुधन असणाऱ्या गोशाळेस २५ लाख रुपये देण्यात येणार आहे. या योजनेमुळे गोवंश संवर्धनास मोठ्या प्रमाणात मदत होणार आहे.

मेंढी व शेळी सहकार विकास महामंडळाची स्थापना

मेंढी पालनाला चालना देण्यासाठी मेंढी व शेळी सहकार विकास महामंडळाची स्थापना करण्याची घोषणा राज्य सरकारने केली आहे. यामहामंडळाचे राज्याचे मुख्यालय अहमदनगर असणार आहे. पशुसंवर्धनाच्या व्यवसायात ग्रामीण अर्थचक्राला गतिमान करण्याची क्षमताअसल्याने या व्यवसायाची व्याप्ती वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. या महामंडळाच्या माध्यमातून राष्ट्रीय सहकार विकासपरिषदेच्या माध्यमातून १० हजार कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

बोव्हाईन ब्रिडींग कायदा -देशी पशुधनाचे संकरीकरण

महाराष्ट्रात दुग्धोत्पादन क्षमता वाढवण्यासाठी विशिष्ट जातीच्या नसलेल्यागायींचे संकरीकरण आणि विशिष्ट जात नसलेल्या म्हशींची दर्जावाढ पद्धतीने सुनियोजितपणे गुणवत्ता वृद्धी केली जात आहे. गायी व म्हशीमध्ये कृत्रिम रेतनाकरिता गोठीतवीर्य निर्मिती, प्रक्रिया, साठवण, विक्री, वितरण आणि प्रत्यक्ष कृत्रिम रेतन करणे तसेच सहाय्यक पुनरुत्पादक तंत्र (-ीळींशव ठशीर्विलींळींशढशलहपेश्रेसळशी) आणि यासंबंधित सर्व बाबींसाठीचे नियमन करण्यासाठी राज्यात बोव्हाईन ब्रिडींग कायदा लागू करण्यातयेणार आहे.

पशुवैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या आंतरवासिता भत्त्यात वाढ

पशुवैद्यकीय महाविद्यालयातील आंतरवासिता विद्यार्थ्यांना देण्यात येणारा आंतरवासिता भत्ता ६ हजार रुपयांवरुन ११ हजार रुपये करण्यात आला आहे. राज्य शासनाने पशुवैद्यकीय सेवांच्या दर्जामध्ये वाढ करण्याचे निर्णायक पाऊल टाकले आहे.

विदर्भ व मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प

विदर्भ व मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प हा प्रकल्प राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत राबविण्यात येत होता. त्या अंतर्गत विदर्भ वमराठवाड्यातील ११जिल्ह्यातील ४ हजार २६३ गावांमध्ये अनुदानावर पशुखाद्य व खनिज मिश्रण पुरवठा, संतुलित आहार सल्ला, दुधाळ जनावरे वाटप, वैरण विकास कार्यक्रम, प्रशिक्षण, वंध्यत्व निवारण शिबिरे, गोचीड निर्मूलन इत्यादी बाबी राबविण्यात आल्यामुळे सद्यस्थितीत सरासरी दैनंदिन दुध संकलन हे ३ लाख लिटर प्रतिदिन इतके वाढले आहे.

योजने अंतर्गत वाटप होणाऱ्या दुधाळ जनावरांच्या किमतीमध्ये सुधारणा

राज्यात विविध योजने अंतर्गत वाटप करण्यात येत असलेल्या दुधाळ जनावरांच्या किमतीमध्ये वाढ करण्यात आली आहे. या किंमती पूर्वी गायव म्हशींसाठी ४० हजार रुपये अशा होत्या. आता गायींसाठी ७० हजार व म्हशींसाठी ८० हजार अशा स्वरूपात किमतीमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर योजना यापूर्वी अहमदनगर जिल्हा व पुणे विभागातील जिल्ह्यांना लागू नव्हती. आता राज्यात सर्वच जिल्ह्यातही योजना राबविण्यात येणार आहे.

पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही

१. पशुधन विकास अधिकारी गट-अ या संवर्गातील रिक्त पदे भरणेसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक १४.०२.२०२२ अन्वये २९८पदांची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. या संदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून चाळणी परीक्षा दि. २६/१२/२०२२ रोजी झालेलीअसून, उक्त पदांची पदभरती बाबतची कार्यवाही सुरु आहे.

२. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन गट-अ या संवर्गातील रिक्त पदे भरणेसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जाहिरात दिनांक १८.०२.२०२२अन्वये ५६ पदांची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. या संदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून चाळणी परीक्षा दि. २६/१२/२०२२रोजी झालेली असून, उक्त पदांची पदभरती बाबतची कार्यवाही सुरु आहे.

३. पशुधन विकास अधिकारी गट-अ या संवर्गाची२९३ व पशुधन पर्यवेक्षकांची(जि.प. व राज्यस्तर) १४२१ पदे बाह्ययंत्रणेमार्फत ११ महिन्याच्या करारावर कंत्राटी पद्धतीने मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार बाह्ययंत्रणेमार्फत पशुधन विकास अधिकारी गट-अ या संवर्गाची १०४ पदे उपलब्ध झालेली आहेत. तसेच पशुधन पर्यवेक्षक संवर्गात ११९६ इतकी पदे उपलब्ध झालेली आहेत.

राज्यस्तरीय कुक्कुट समन्वय समितीचे गठन

राज्यात खाजगीरित्या व्यावसायिककुक्कुटपालन करणारे शेतकरी, तसेच कुक्कुट व्यवसाय करणाऱ्या कंपन्यांना कुक्कुटपालन व्यवसाय करतांना येणाऱ्या अडचणींवर उपाययोजना करण्यासाठी २१ ऑक्टोबर २०२२ रोजी महत्वपूर्ण शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या शासन निर्णयानुसार पशुसंवर्धन आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कुक्कुट समन्वय समितीचे गठन करण्यात आले आहे. ही समिती खाजगीरित्या व्यावसायिक कुक्कुटपालन करणारे शेतकरी तसेच कुक्कुट व्यवसाय करणाऱ्या कंपन्यांना येणाऱ्या अडचणींच्या संदर्भात शासनाच्या विविध विभागाशी संबंधित बाबी संदर्भात आवश्यक त्या शिफारशी करणार आहे.

फिरत्या भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळांची स्थापना

राज्यातील विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी अनुक्रमे अकोला, छ. संभाजीनगर आणि अहमदनगर येथे प्रत्येकी एक यानुसार एकूण ३ फिरत्या भ्रूण प्रत्यारोपण प्रत्यारोपण प्रयोगशाळांची स्थापना करण्यात येणार आहे. भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानामुळे उच्च दूध उत्पादन क्षमता असलेल्या गाईंपासून स्त्री-बिजांचे संकलन करून अशा स्त्री बिजांचे प्रयोगशाळेत सिद्धवळूच्या विर्यापासून फलन करुन असे गर्भ दुसऱ्या गाईंमध्ये प्रत्यारोपण करण्यात येणार आहे. या तंत्रज्ञानामुळे उच्च दूध उत्पादन क्षमता असलेल्या गाईच्या हयातीत १० ते १२ वासरांऐवजी मोठ्या प्रमाणात वासरांची निर्मिती करणे शक्य होणार आहे.

शेतीला पुरक असा जोडधंदा म्हणून पशुधन व्यवसायाकडे पाहिले जाते. दूध व कुक्कुटपालन व्यवसायाला नवीन दिशा मिळावी, नव-नवीन तंत्रज्ञानाचा पशुधन व्यवसायाला फायदा कसा होईल याला प्राधान्य दिले जाणार आहे. शेळी-मेढी पालनाला चालना देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाची राज्य सरकारने स्थापना केली आहे. या महामंडळाचे राज्याचे मुख्यालय अहमदनगर असणार आहे. यासाठी वार्षिक दहा हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. हा व्यवसाय करणाऱ्या तरूणांना १ लाख ७५ हजार रूपयांचे बिन व्याजी कर्ज दिले जाणार आहे. पशुसंवर्धनाच्या व्यवसायात ग्रामीण अर्थचक्राला गतिमान करण्याची क्षमता असल्याने या व्यवसायाची व्याप्ती वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. आपली राज्याची अर्थव्यवस्था कृषी क्षेत्रावर आधारीत आहे. येणाऱ्या काळात पशुपालन, दुग्धव्यवसाय आणि शेळी- मेंढीपालन या व्यवसायाला जास्तीत जास्त प्राधान्य देण्याचे राज्याचे धोरण असणार आहे.

वर्षा फडके- आंधळे, विभागीय संपर्क अधिकारी (पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय)

पान १ वरुन

वसुधैव कुटुंबकमसाठी हजारोच्या

सतीश घोडके आणि सहायक क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव आदी उपस्थित होते.

यावेळी प्रास्ताविकामध्ये श्री चव्हाण म्हणाले, वसुधैव कुटुंबकम साठी योग ही यावर्षी योग दिनाची संकल्पना आहे. जी२० ची भारत अध्यक्षता करत आहे. यावेळी पंतप्रधानाच्या उपस्थितीमध्ये युनोमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात येत आहे. महाराष्ट्र मध्ये प्रथमच शहरातील सर्व योग संस्थानी एकत्रितपणे हजारोंच्या संख्येने योग दिन उत्साहात साजरा करत असल्याचे सांगितले.

मुख्य समन्वयक अळळीमोरे म्हणाल्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या तीन महिन्यापासून पतंजली व योग समन्वय समितीच्या वतीने प्रशिक्षित योग शिक्षक तयार केले असून त्यांनी आज आयुष मंत्रालयाच्या प्रोटोकॉल प्रमाणे जिल्हाभर योग महोत्सवामध्ये सहभागी झाले असून जिल्ह्यातून लाखोंच्या संख्येने लोक योग करत आहेत. केंद्रीय संचार ब्यूरो याचे योग्य नियोजन करत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी एन एन सी ३८ बटालियनची विद्यार्थींनी अमृता गुंफेकर ने म्युझिकल योगाच्या माध्यमातून अतिशय अवघड अशा कसरती करून उपस्थितांची मने जिंकली. नवव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या सुरुवातीला जितेंद्र महामुनी आणि पुष्कराज गोयल यांनी शंखध्वनी करून योगाभ्यासाची सुरुवात केली. आयुष्य मंत्रालयाने नेमून दिलेल्या प्रोटोकॉल प्रमाणे सुरुवातीला भारतीय योग संस्थेच्यावतीने दमयंती मेथे यांनी शिथिली करण्याचे व्यायाम घेतले. योग साधना मंडळाच्या वतीने रोहिणी उपळाईकर यांनी उभी आसने घेतली व योग सेवा मंडळाच्या वतीने साधना पाये यांनी बैठे व पोटावरील झोपून करावयाची आसने घेतली. विवेकानंद केंद्राच्या वतीने दिपाली कुलकर्णी यांनी पाठीवरील योगासने घेतली. पतंजली योग पिठाच्या वतीने सुजाता सुतार यांनी प्राणायाम घेतले. गीता परिवाराच्या वतीने श्रीमती जाधव यांनी ध्यान धारणा घेतली.

यावेळी घेण्यात आलेल्या योगगुरू स्पर्धेतील नितीन मोरे, रोहिणी उपळाईकर, साधना पाये आणि वीणा नाईक यांना उपस्थितांच्या हस्ते योगगुरू म्हणून सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजाता शास्त्री यांनी केले. अंबादास यादव यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या सुरुवातीपासूनच सोलापूर शहरातील पोलीस आयुक्तालयाचे हवालदार श्री ठोसर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस बँड पथकाने अतिशय सुरेख देशभक्तीपर गीत गायन केले. तसेच योग संचालनाच्या वेळी धून वाजवून उपस्थितीना मंत्रमुग्ध केले.

सदरील कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी सकाळी सहा पासूनच उपस्थितांनी गर्दी केली होती. यावेळी पतंजली योगपीठाचे रघुनंदन भुतडा, प्रभाकर जाधव, योग असोसिएशनचे डी एम वेदपाठक, विवेकानंद केंद्राचे नंदकुमार चितापूरे, डॉ शोभा शहा, भारतीय योग संस्थाचे दत्तात्रय चिवडशेट्टी, राजशेखर लशमेश्वर, योग सेवा मंडळाचे सुनील आळंद, संतोष सासवडे, योग साधना मंडळाचे नागनाथ पाटील, रमेश सोनी, रुद्र अकादमी ऑफ मार्शल आर्ट अँड योगच्या संगीता जाधव, हार्टफुलनेस इन्स्टिट्यूट प्रमोद पाटील, भारत स्काउट गाईडचे श्रीधर मोरे, अनुसया सिरसाठ, एन.सी.सी. बटालियन ३८ चे सुभेदार अण्णाराव वाघमारे, सुभेदार रामचंद्र, हवालदार मनीषकुमार आदी संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

शहरातील शाळा, विद्यार्थी आणि शिक्षक, क्रीडा संस्था, महाविद्यालये, आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दिलासादायक..! उद्यापासून..

आवाहन कृषी विभागसह तज्ज्ञ करत आहे. मान्सूनचा पेरणीयोग्य पाऊस म्हणजेच ७५ ते १०० मिमी पाऊस झाल्यानंतरच खरीप पिकांची पेरणी केली पाहिजे. मात्र अनेकदा शेतकरी थोडाफार पाऊस पडला आणि शेती ओली झाली की लगेच लागवड सुरु करतात. मात्र पुढे पाऊस न झाल्यास दुबार पेरणीची वेळ येते. त्यामुळे शेतकऱ्यांनी घाई न करता योग्य पाऊस झाल्यावरच पेरणी करावी असा सल्ला अभ्यासकांनी दिला आहे.

मुंबईच्या प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवलेल्या अंदाजानुसार मराठवाड्यात २३ ते २९ जूनदरम्यान पाऊस सरासरीपेक्षा अधिक असण्याची शक्यता आहे. तर विस्तारित अंदाजानुसार मराठवाड्यात २५ जून ते १ जुलैदरम्यान कमाल व किमान तापमान सरासरीएवढे असणार आहे. तर पाऊस सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे अजूनही मराठवाड्यात मान्सूनचे आगमन झालेलं नाही. त्यामुळे अशात शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे. मान्सूनचा पेरणीयोग्य पाऊस म्हणजेच ७५ ते १०० मिमी पाऊस झाल्यानंतरच खरीप पिकांची पेरणी करावी, तज्ज्ञ देत आहे.

१५ ते २४ जानेवारी २०२४

२४ ते २५ जानेवारी २०२४ पर्यंत सर्वसामान्य भाविकांना मंदिरात दर्शन घेता येणार आहे. अयोध्येसाठी हा फार मोठा उत्सव असेल. देशभरातील काही ठिकाणी हा कार्यक्रम व्हर्चुअली दाखवला जाईल. परदेशातील भारतीय दूतावासांमध्ये प्राणप्रतिष्ठा लाईव्ह पाहता यावी, यासाठी तयारी सुरु असल्याचं त्यांनी सांगितलं.दरम्यान राम मंदिरातील गाभाऱ्याच्या मुख्यद्वारावर सोन्याचं कोरीव काम असणार आहे. तसंच मंदिराचा १६१ फुटांचा कळसालाही सोन्याचं आच्छादन असेल.

योध्येतील राम मंदिराचा पहिला टप्पा ३० डिसेंबरपर्यंत पूर्ण होणार असल्याची नृपेंद्र मिश्रा यांनी दिली. ३० डिसेंबर २०२३ पर्यंत पहिला टप्पा पूर्ण करण्याच निर्णय ट्रस्टने घेतला आहे. पहिल्या टप्प्यात ग्राउंड फ्लोअरचे पाच मांडव पूर्ण करण्यात येण्यार आहे. यामध्ये एक प्रमुख गर्भगृह असणार ज्यामध्ये भगवान रामाच्या मूर्तीची स्थापना केली जाणार आहे. या पाच मांडवाच्या निर्मितीसाठी जवळपास १६० खांब असणर आहे. तसेच आयकॉनोग्राफीचे काम देखील लवकर पूर्ण कण्यात येणार आहे. मंदिराच्या सर्वात खालच्या भागात भगवान रामाच्या दर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणर आहे. तसेच वीज, पाणी या सारख्या इतर सुविधा उपलब्ध करून देण्यात येणर आहे. ही सर्व कामे ३० डिसेंबर पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

भारताचा पाकिस्तानवर ..

८१ व्या मिनिटाला एक गोल केला. छेत्रीने तीनमधील दोन गोल दोन गोल पेनल्टीवर केले. पाकिस्तानच्या संघाला एकही गोल करता आला नाही.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील फुटबॉल सामना एकतर्फी झाला. संपूर्ण सामन्यात टीम इंडियाचे वर्चस्व होते. एकादाही पाकिस्तानच्या संघाला पुनरागमन करता आले नाही. सामन्यात पाकिस्तानचे खेळाडू भारतीय कोचला भिडले. ४५ व्या मिनिटाला हा प्रसंग घडला. पाकिस्तानी खेळाडू जेव्हा थ्रो इन घेत होते, तेव्हा भारतीय कोच इगोर स्टिमॅक यांनी चेंडूला हात मारला.. त्यानंतर पाकिस्तानचे खेळाडू भारतीय कोचसोबत भिडले. त्यानंतर भारतीय खेळाडूही आले. दोन्ही संघाच्या खेळाडूमध्ये धक्काबुक्की झाली. थोड्यावेळानंतर हे प्रकरण शांत झाले. त्यनंतर रेफरीने भारतीय कोचला रेड कार्ड दिले. तर पाकिस्तानच्या कोचला येलो कार्ड दाखवला. तर भारतीय डिफेंडर संदेश झिंगन आणि पाकिस्तानचा मिड फील्डर राहिस नबी यांनाही येलो कार्ड दाखवले.

सैफ चॅम्पियनशिप स्पर्धेत टीम इंडियाचा दबदबा पाहायला मिळाला आहे. भारतीय संघाने आतापर्यंत आठवेळा जेतेपद मिळवले आहे. १९९३, १९९७, १९९९, २००५, २००९, २०११, २०१५ आणि २०२१ मध्ये टीम इंडियाने जेतेपद मिळवलेय. मालदीवने २००८ आणि २०१८ मध्ये जेतेपद मिळाले. त्याशिवाय बांगलादेशने २००३ मध्ये चषकावर नाव कोरले होते. सध्या भारतीय संघाचे फीफा रॅंकिंग १०१ इतके आहे. सैफ चॅम्पियनशीपमुळे भारताला फिफा रॅंकिंग सुधारण्याची संधी असेल. भारतीय संघाने रविवारी भुवनेश्वर येथे लेबनान संघाला २ -० ने पराभूत करत इंटरकांटिनेंटल चषकावर नाव कोरले होते.

भरडधान्य बियाणांचा जिल्ह्यातील

करणे हा प्रमुख हेतू आहे. पौष्टिक तृणधान्य उत्पादन वाढ करण्याच्या अनुषंगाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान अंतर्गत पौष्टीक तृणधान्य मिनीकिट वाटप व मिलेट क्रॉप कॅफेटेरिया बाबीची अंमलबजावणी जिल्ह्यात करण्यात येणार आहे. यात सोलापूर जिल्ह्याने पुढाकार घेत जिल्ह्यात शेत तिथे पौष्टिक तृणधान्य मोहिमे अंतर्गत पौष्टिक तृणधान्य पिकांचे क्षेत्र व उत्पादन वाढीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सुधारित बियाण्याचे मिनीकिट आधारित बियाणे उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

याबाबत कृषि विभागाने ज्वारी, बाजरी, नाचणी, राळा, कोदो व राजगिरा या भरडधान्यांचे मिनीकिट बियाणे महाबीज, सोलापूर व राष्ट्रीय बीज निगम पुणे यांच्याकडून भरडधान्यांचे एकूण ३५१५० मिनीकिटस् मागवण्यात आले आहे. यामध्ये राष्ट्रीय बीज निगम पुणेकडून खरीप ज्वारी एकूण ३६१५, बाजरी ७९५७, राजगिरा १९५५ असे एकूण १३५२७ मिनीकिटस् तसेच, महाबीज, सोलापूर यांच्याकडून खरीप ज्वारी ६७९५, बाजरी ५०६३, राळा ५२१०, कोडो २६००, राजगिरा १९५५ असे एकूण २१६२३ मिनीकिटस् ची मागणी करण्यात आली आहे. तरी या मिनीकिट भरडधान्य बियाणांचा जिल्ह्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पत्रकात करण्यात आले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते रस्त्याचे भूमिपूजन

पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी यात्रा २०२३ भाविक व यात्रेकरूंच्या सुख सोयी सुविधा पंढरपूर नगरपालिकेने व ग्रामीण भागामध्ये रस्ते दुरुस्ती करण्यात सुरुवात झाली असून गोपाळपूर येथील संत जनाबाई यांचा ताकाचा डेरा पाठीमागील बाजूस रस्ता डांबरीकरण करण्यास सुरुवात झाली आहे.

या डांबरीकरण रस्त्याचे उद्घाटन पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या शुभहस्ते व श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे संचालक व ज्येष्ठ नेते श्री दिलीप भाऊ गुरव यांच्या उपस्थितीमध्ये उद्घाटन सोहळा पार पडला..

आमदार मा. दादासाहेब यांच्या सर्वसमावेशक राजकीय नेतृत्वावर आणि समर्पणशील सामाजिक कार्य कौशल्यांवर नेहमीच प्रेम करणाऱ्या गोपाळपूर नगरीच्या जनतेसाठी आवश्यक मूलभूत, पायाभूत आणि भौतिक सोयी - सुविधा सदर निधीच्या माध्यमातून मार्गी लागतील आणि गावाचा चौफेर विकास वारू वेगाने पुढे सरसावेल असा ठाम विश्वास मा. आमदार महोदय यांनी व्यक्त केला.

सदर प्रसंगी मा. उपसभापती श्री विजय सिंह दादा देशमुख, सरपंच श्री.विलास मस्के, उपसरपंच

श्री.उदय पवार, युवा नेते श्री.महेश चव्हाण,श्री. ग्रा. प. स.राहुल माने,ग्रा. प. स.श्री.अरुण बनसोडे,ग्रा. प. स.श्री.पांडूरंग देवमारे,ग्रा. प. स.अजय जाधव,ग्रा. प. स.श्री.किरण पवार पाटील, श्री.उल्हास कोले,श्री.विजय भूमकर,श्री. नागू तात्या बनसोडे, श्री. निवृत्ती चव्हाण, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते....

तुळजापूर चे नुतन तहसीलदार यांचे पत्रकारांनी केले स्वागत

वागदरी/प्रतिनिधी : तुळजापूर तहसील चे नुतन तहसीलदार अरविंद बोळंगे यांचा पत्रकार तथा कार्यकर्ते यांनी बुके देवून स्वागतपर सत्कार केला. उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर तहसीलचे तहसीलदार सौदागर तांदळे यांची अन्यत्र बदली झाली असून त्यांच्या जागी अरविंद बोळंगे यांनी तुळजापूर तहसील कार्यालयाचा तहसीलदार म्हणून पदभार स्विकारला असून नुकतेच ते आपल्या पदावर रूजू झाले आहेत. त्याबद्दल रिपब्लिकन पार्टी ऑफ

इंडिया (आठवले) चे उस्मानाबाद जिल्हा समन्वय तथा पत्रकार एस.के. गायकवाड(वागदरी), महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे तुळजापूर तालुका सचिव तथा संगणक परिचारक संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष शाम नागीले (नंदगाव),पत्रकार अमित लोंढे (येडोळा) व लाडप्पा माने यांनी नुतन तहसीलदार अरविंद बोळंगे यांची कार्यालयात सदिच्छा भेट घेऊन बुके देवून त्यांचा स्वागतपर सत्कार केला. याप्रसंगी तहसीलदार अरविंद बोळंगे म्हणाले की कार्यकर्ते, पत्रकार, लोकप्रतिनिधी व शासन यांनी समन्वयाने काम करणे गरजेचे आहे.

डुबेरे जनता विद्यालयात आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा

निफाड/राजेंद्र थोरात : सिन्नर तालुक्यातील डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात साजरा करण्यात आला.या प्रसंगी अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य किशोर जाधव होते. जाधव यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्व, फायदे ,योगदिन का साजरा केला जातो याविषयी सविस्तर माहिती देऊन विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात दररोज योगा केल्यास तुम्ही शारीरिक आजारापासून दूर रहाल .योगामुळे शारीरिक व मानसिक शक्ती वाढवण्यास मदत होते. मन संतुलित व प्रसन्न राहुन मनाची एकाग्रता वाढते म्हणून विद्यार्थ्यांनी दररोज योगासने करावेत असे आव्हान

त्यांनी केले . क्रीडा शिक्षक एस .बी. गुरुळे यांनी विद्यार्थ्यांना योगाचे प्रात्यक्षिक दाखवून योगासने करून घेतली. त्यांना विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. शालेय समितीचे अध्यक्ष नारायणशेठ वाजे,उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठल तात्या वामने यांनी योगदिनाच्या शुभेच्छा दिल्या.प्राचार्य किशोर जाधव ,पर्यवेक्षक अशोक हिंगे यांनी सक्रीय सहभाग घेऊन योगासने केली. प्रास्ताविक व सूत्रसंचालन सांस्कृतिक प्रमुख पी.आर.करपे यांनी तर आभार सोमनाथ गिरी यांनी मानले.यावेळी डी. एच. जाधव,अरुण डावरे, बाळासाहेब वारुंगसे,रामदास वारुंगसे,सुदाम वारुंगसे,सोमनाथ माळी,सोमनाथ पगार,डी. ए.रबडे,के.एस.शिंदे, राजेंद्र गांगुर्डे,रेखा खंडीझोड, राजश्री बोडके, सुषमा थोरात, वरिष्ठ लिपिक राणी शिंदे,रोहिणी भगत,रवि गोजरे, अनिल काळे, ज्ञानेश्वर कडभाने,संदीप सांगळे, निवृत्ती बर्गे,संकेत जाधव, ऋषिकेश कुंदे आदींसह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

इटकूर शाळेचे सलग पाचव्या वर्षी नवोदय साठी ४ विद्यार्थी पात्र

कळंब/सुधाकर रणदिवेः सन २०२२/२३ या शैक्षणिक वर्षात जवाहर नवोदय विद्यालय तुळजापूर येथे इयत्ता सहावीच्या प्रवेशासाठी दि. २९ एप्रिल २०२३ रोजी घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षेत जि. प. प्रशाला इटकूर येथे इयत्ता ५ वी वर्गात शिकत असलेल्या चार विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.१)रिया विकास कोठावळे, २)सिद्धी रामलिंग कानडे, ३)संस्कृती अर्जुन भारती ४)समर्थ किरण मिटकरी या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

या निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे इयत्ता ६ वी ते १२वी पर्यंतचे CBSE चे शिक्षण अगदी मोफत होणार आहे. या यशवंत विद्यार्थ्यांना प्रशालेतील शिक्षक ए. एस. क्षिरसागर सर व ए. एम. यादव मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले. प्रशालेच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री. तुकाराम गरूडे सर, मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गुप्ता साहेब, केंद्रप्रमुख पांडुरंग गामोड सर, विस्तार अधिकारी सुशील फुलारी सर, गट शिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते सर, शाळा व्यवस्थापन समिती व इटकूर ग्रामस्थ अशा सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

दूरशिक्षण केंद्रात रोजगार संधीवर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र अंतर्गत विभागीय केंद्र, सांगली, श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली, कन्या महाविद्यालय मिरज आणि श्रीमती राजमती नेमगोंडा पाटील कन्या महाविद्यालय सांगली, यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दिनांक २२.६.२०२३ रोजी दुपारी १२ वाजता शिवाजी विद्यापीठातील प्लेसमेंट समन्वयक डॉ. आर.डी. पडवळ यांचे 'भविष्यातील रोजगाराच्या संधी आणि कौशल्य विकास' या विषयावर विशेष ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी.के. मोरे यांनी दिली. या कार्यशाळेसाठी प्राचार्य डॉ.आर.जी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ.उल्हास माळकर, प्राचार्य डॉ. मानसी गानू,उपकुलसचिव डॉ.एस. एम. कुबल, उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे उपस्थित राहणार आहेत. तरी सर्व विद्यार्थ्यांनी व अभ्यागतानी सदर व्याख्यानास ऑनलाईन उपस्थित रहावे असे आवाहन संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी केले.

नांदेड येथील गुरुद्वारा बोर्ड तर्फे डॉ विश्वासराव आरोटे यांचा विशेष सन्मान

अहमदनगर/प्रतिनिधी : नांदेड येथील गुरुद्वारा बोर्ड तर्फे विशेष सन्मान महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ विश्वासराव आरोटे व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ब्रँड अँबेसिडर संजय फुलसुंदर यांचा यावेळी शिरोपा तलवार मानपत्र शाल पुस्तिका देऊन सत्कार करताना गुरुद्वारा बोर्डचेगुरुद्वारा बोर्डाचे अधीक्षक ठाणसिंघ विश्ववस्त. दमदमासाहिब गुरुद्वारा चे माजी प्रभारी हुकूम सिंग कराबिन. संचखंड गुरुद्वारा हुजुर साहिब मुख्य अधिक्षक थानसिंग बंगाई ..यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ अभयकुमार दांडगे.वुत्तवाहीनी संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष विजयकुमार कुलदिपके..जिल्हा अध्यक्ष संग्राम मोरे. जिल्हा सचिव रुपेश पाडमुख नांदेड जिल्हा निवड समिती अध्यक्ष मोहन पाटील.Avp news विभागीय संपादक हरणामसिंग चव्हाण.

पत्रकार नाविद अहेमद दैनिक समर्थ गांवकरी जिल्हा प्रतिनिधी महादेव एडके यासह अनेक मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते

आषाढी यात्रेमध्ये अन्न प्रशासनाची सात पथके

पंढरपूर/प्रतिनिधीः हॉटेल मठ मेवा मिठाई दुकानात सूचना व तपासणी सुरू आषाढी यात्रा कालावधीमध्ये विठ्ठलाच्या प्रसाद पेढा व खाद्यपदार्थांची चांगली मागणी व मोठ्या प्रमाणात विक्री होत असते म्हणून व्यापारी अन्नपदार्थांमध्ये भेसळ करतात यामुळे भाविकांच्या आरोग्यास धोका होण्याची शक्यता असते म्हणून यात्रा कालावधीमध्ये अन्नाची तपासणी करण्यासाठी सात पथके तैनात करण्यात आले आहेत अशी माहिती अन्य प्रशासन निरीक्षक उमेश भुसे यांनी दिली आहे. संतांचे व पालखी सोहळे पंढरपूर मध्ये येऊ लागले आहेत पालखी सोहळ्यात लाखो भाविकांचा सहभाग झाले आहेत पालखी सोहळे विश्रांती व मुक्काम असलेल्या ठिकाणी हॉटेल मेवा मिठाई दुकानातील अन्नाची तपासणी करण्यात येत आहे

आषाढी यात्रेमध्ये पंढरपुरात बारा ते तेरा लाखाहून अधिक भाविक असतात बाहेर विठ्ठलाचे प्रसाद पेढे लाडू तसेच अन्नपदार्थ हॉटेल स्वीट मार्ट येथून खरेदी करतात म्हणून अन्नपदार्थ चांगली मागणी येते याचा फायदा घेऊन व्यापारी भेसळ करून खाद्यपदार्थ तयार करतात यामुळे भाविकांना आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता असते म्हणून यात्रा कालावधीमधील सात पथकांमार्फत अण्णांची तपासणी करण्यात येणार आहे भेसळ आढळून आल्यास व्यापाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल यात्रेच्या अगोदर सर्व व्यापाऱ्यांना वेगवेगळ्या सूचना देण्यात आलेल्या आहेत

निफाड येथे योगशिबीर उत्साहात संपन्न

निफाड/राजेंद्र थोरात : जागतिक योगदिनाच्या पार्श्वभूमी वर बृहन्महाराष्ट्र योग परिषद निफाड व नगरपंचायत निफाड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पाच दिवसीय योग शिबीराची सांगता निफाड नगरपंचायत च्या नगराध्यक्षा सौ. रत्नमालाताई कापसे,वैनतेय विद्यालयाचे विश्वस्त श्री. वि. दा. व्यवहारे सर व श्री रतनतात्या वडघुले योग परिषदेच्या अध्यक्षा डॉ सिमाताई डेर्ले व मान्यवरांच्या उपस्थितीत झाली. ग्रामसंस्कार केंद्र निफाड येथे पाच दिवस चाललेल्या योगशिबीरात योग परिषदेच्या अध्यक्षा डॉ. सिमाताई डेर्ले ,योग शिक्षिका कावेरी कहाणे, यांनी महिलांना विविध योग प्रकार, योगासने,..... प्राणायाम,मुद्रा ,बंध,तसेच योगनिद्रा ,प्राणाकर्षण क्रिया व डोळ्यांसाठी यौगिक क्रिया त्राटक अशा विविध विषयांवर माहिती देऊन प्रात्यक्षिके करून घेतली. योग शिबीराचे निमित्ताने महिलांची मोफत आरोग्य तपासणी डॉ रामेश्वर गोरडे (माऊली हास्पिटल) यांनी केली. महिलांसाठी चालवलेले हे योग शिबीर महिलांनी नोंदवलेल्या लक्षणीय उपस्थितीमुळे खूपच यशस्वी झाले व योग हा आजच्या विद्यार्थ्यां पर्यंत पोचायला हवा ,आमच्या मुलां मध्ये योगाविषयी ओढ व जिज्ञासा निर्माण व्हायला हवी अशी भावना डॉ सिमाताई डेर्ले यांनी व्यक्त केली. वि.दा.व्यवहारे.सर रतन तात्या वडघुले.कमल बिडवे व रंजना बजाज यांनी मनोगत व्यक्त केले. लीना छाजेड व आरती बागूल यांनी स्वागत केले तर मनिषा चंद्रकांत वाघ हिने आभार मानले. योग शिबिराच्या यशस्वीतेसाठी नगरपंचायतचे सर्व नगरसेवक,कर्मचारी व योग परिषदेच्या सदस्यांचे सहकार्य मिळाले.

प्रा. एस. बी. चौगुले यांना पीएच. डी पदवी प्राप्त



नेसरी : येथील तुकाराम कृष्णाजी कोलेकर कला आणि वाणिज्य महाविद्यालयातील वाणिज्य व व्यवस्थापन विभाग प्रमुख प्रा. एस. बी. चौगुले मूळ गाव कडगाव ता. गडहिंग्लज यांनी शिवाजी विद्यापीठामधून वाणिज्य विषयात पीएच. डी पदवी संपादन केली. त्यांचा संशोधनाचा विषय अ स्टडी ऑफ बिझनेस अपॉर्च्युनिटीज फॉर रूरल पिपल इन मायक्रो एन्टरप्रायझेस सेक्टर विथ स्पेशल रेफरन्स टू सदर्न महाराष्ट्र असा होता. त्यांना डी. आर. माने महाविद्यालय कागलचे प्राचार्य डॉ. प्रविण चौगले यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. चौगुले यांचे पीएच. डी पदवी संपादन केल्याबद्दल सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. संस्थाअध्यक्ष ॲड हेमंत कोलेकर, सचिव डॉ. अर्चना कोलेकर, शिवाजी विद्यापीठाचे वाणिज्य व व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. ए. एम. गुरव, प्राचार्य डॉ. एस. बी. भांबर यांचे विशेष प्रोत्साहन लाभले.

शब्दकोडे क्र ३६



आडवे शब्द १. वस्त्र ३. त्याप्रमाणे ५. अशा माणसाकडे काहीही काम सोपवू नये ११. निश्चय १२. डोळ्याच्या उघड्या पृष्ठभागावरील पारदर्शक आवरण १४. पुन्हा १५. कधीही पोळे न सोडणारी १६. मुक्काम १८. ओसाड, वैराण १९. पौर्णिमा २०. लेखणीचा आधुनिक प्रकार २१. वेल २३. साडीच्या खालच्या भागाला लावलेली अस्तराची किनार २४. बाव, झावळीच्या पातीमधील काडी २५. सूर्यास्ताआधी २७. लक्ष - पण भान नाही २९. तोरा ३२. आवरण ३५. पदवी ३६. सूट ३७. सर्वात लहान ३९. सर्वात मिळून, सर्वांचे ४०. अपुरा ४२. रोटीचा प्रकार ४३. गोष्ट ४४. तीव्र लोभ ४५. सत्तेवर आलेला ४८. आर्जवे ५०. भित्रा ५२. डुक्कर ५४. दुधी भोपळ्याचा गोड पदार्थ ५६. चांदी ५८. सैनिक ६०. सुळका ६१. पृथ्वी ६३. व्यायामप्रकार, अवघड कामगिरी ६४. शहाणपण यावर अवलंबून नसते ६६. लिंबाची निरूपयोगी जात ६७. एकाच वेळी, अचानक ६९. अंत:करण ७१. शेवट ७३. जोग धबधबा या नदीवर (कर्नाटक) आहे ७४. सहजगत्या ७६. वेग ७९. हक्क सांगणे ८१. प्रमाद ८३. लहान मुलाची तुमान ८४. गुंड ८५. टेंभा ८७. बंदुकीने केलेला हल्ला ९१. चोप ९३. इंद्राची पत्नी ९४. सावध ९७. स्वच्छ ९८. ऋण ९९. अंदाज १००. एक शेंगभाजी १०२. गंध, परिमल १०४. टिंगल १०५. राजस्थानी स्त्रियांच्या पेहरावातील नक्षीचा घोळदार परकर १०६. घाणेरडे १०७. टोकदार १०८. श्रम १०९. ऋषी

उभे शब्द १. स्थापनादिवस २. हा प्राणी स्वत:चा रंग बदलू शकतो ३. पोहण्यासाठी बांधलेला तलाव ४. सर्प ५. शंकराचे प्रिय फळ ६. पूर्वज ७. माळजमीन ८. दंत ९. 'अपराध मीच केला, शिक्षा तुझ्या कपाळी.....' १०. विलंब, दिरंगाई १३. डोक्याचा केस गळून गेलेला भाग १५. जंगल १७. दूरचा फेरा ह्न बहुदा उगाच पडणारा १९. रोमांच २२. लकेर २६. विधानातील स्पष्ट विसंगती २८. आजीच्या जमान्यातील बिनविजेचा मिक्सर-ग्राईंडर! ३०. परिमार्जन ३१. अतिशय हानिकारक ३३. व्रत ३४. कमळ, मुलाचे एक नाव ३५. सज्जन ३६. डोंगराच्या माथ्यावरील सपाट जमीन ३८. राजवाडा ४१. कौशल्य ४२. स्त्री ४५. प्रारब्धदेवता ४६. प्रवाह ४७. तुरूंग ४८. कुरळे केस ४९. अभिमानास्पद ५१. फुलातील पराग ५२. साबुदाण्याचा तळीव पदार्थ ५३. आक्षेप ५५. श्रीकृष्णाच्या जीवावर उठलेली मावशी ५७. युद्धातील यश ५९. गुडघ्यापासून घोट्यापर्यंतचे हाड ६०. मान्य ६२. हाक ६५. कलिका ६८. चिलट ६९. तनू ७०. सर्वांना ठाऊक झालेले ७२. जर, जेव्हा ७५. स्थूल ७७. किनारा ७८. किरकोळ, फालतू ८०. डावा ८१. शेगडी ८२. ताकद ८६. विज्ञान ८७. अडचण ८८. बडबडगीतांची शाळा ८९. मृदंग ९०. शर्विलक ९१. मत्स्य ९२. स्वातंत्र्य ९३. साखर ९५. सार्वजनिक वाहतुकीचे अवजड वाहन ९६. मोठी सुई ९९. सुदृढ, मजबूत १००. निवृत्तीनाथांचे गुरु, नऊ नाथांपैकी एक १०१. कुमक १०३. पूर्व दिशा

पावणे चौऱ्याहत्तर कोटींच्या पंढरपूर देवस्थान मंदिर विकास आराखड्यास मान्यता

पंढरपूर/प्रतिनिधीः लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरपुर या तीर्थक्षेत्राचा विकास करण्यास राज्य शासनाने सर्वोच्च प्राधान्य दिले असून ७३ कोटी ८५ लाख ९५ हजाराच्या पंढरपूर देवस्थान मंदिर विकास आराखड्यास मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय नुकताच जारी करण्यात आला आहे. या निधीमुळे मंदिराचे प्राचीन सौंदर्य उजळून निघण्यास मदत होणार आहे. तसेच मंदिराचे संवर्धन होण्यास मदत होणार आहे.तीर्थक्षेत्राच्या विकास आराखड्यासाठी १९ जुलै २०१६ च्या शासन निर्णयातील आराखड्याची कमाल किंमत मर्यादा २५ कोटी ही अट शिथिल करून पंढरपूर देवस्थान मंदिर विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. पंढरपूर देवस्थान मंदिर विकास आराखड्याअंतर्गत कामांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करून घेण्यासाठी जिल्हाधिकारी सोलापूर यांना संनियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. आराखड्यात प्रस्तावित असलेली कामे दोन टप्प्यात ३१ मार्च २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

पंढरपूर देवस्थान मंदिर विकास आराखडा अंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांसाठी आवश्यक परवानगी घेणे, कामांना तांत्रिक मान्यता घेणे, कामांकरता निधी वितरण करणे आणि आराखड्याशी संबंधित शासनास सादर करायची विवरणपत्रे याची जबाबदारीही जिल्हाधिकारी सोलापूर यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे. राज्य शासनाने मान्यता दिलेल्या ७३ कोटी ८५ लाख ९५ हजाराच्या पंढरपूर देवस्थान मंदिर विकास आराखड्यामध्ये मुख्य मंदिर व संकुलातील मंदिराचे जतन संवर्धन यामध्ये मुख्य विठ्ठल मंदिर (गर्भगृह, चारखांबी, सोळखांबी अर्ध मंडप इ.) साठी ५ कोटी ३ लाख ५८ हजार , रुक्मिणी मंदिर २ कोटी ७० लाख ५३ हजार, नामदेव पायरी व त्यावरील इमारतीचे नूतनीकरण ५ कोटी ५ लाख ५१ हजार ९७४ रुपये, महाद्वार व दोन्ही बाजूच्या पडसाळी ६ कोटी १८ लाख २३ हजार , लाकडी सभामंडप १ कोटी २५ लाख ७२१ रुपये, महालक्ष्मी मंदिर, व्यंकटेश मंदिर व मंदिरातील इतर इमारती (बाजीराव पडसाळ, पश्चिम दरवाजा, तसेच मंदिरातील ३८ परिवार देवता, काशीविश्वेश्वर, शनेश्वर, खंडोबा, गणपती, राम मंदिर वगैरे) साठी ३ कोटी ६९ लाख ७ हजार आणि मंदिरातील दीपमालासाठी २२ लाख २७ हजार.

देवस्थान अखत्यारीतील मुख्य मंदिर समूहाच्या बाहेरील २८ परिवार देवतांच्या मंदिरांचे जतन व संवर्धन साठी ११ कोटी २७ लाखाची तरतूद केली आहे. यामध्ये श्री विष्णुपद मंदिर, श्री डगरी वरील विष्णुपद मंदिर, श्री विष्णू मूर्ती मंदिर, श्री मारुती मंदिर, श्री नारद मंदिर, श्री मारुतीचा पार, श्री रिद्धी सिद्धी गणपती मंदिर, श्री लक्ष्मण पाटील मंदिर, श्री शनि काळभैरव मंदिर, श्री शाकंभरी मंदिर, श्री खंडोबा मंदिर,श्री सोमेश्वर मंदिर , श्री रेणुका माता मंदिर , श्री यमाई तुकाई मंदिर, श्री यल्लमा देवी मंदिर , श्री पद्मावती मंदिर, तहसील कचेरी समोरील श्री मारुती मंदिर, व्यापारी कमिटी मारुती मंदिर, श्री रामबागेतील मारुती मंदिर, श्री व्यास नारायण मंदिर, श्री अंबाबाई मंदिर, श्री लखुबाई मंदिर, श्री सटवाई मंदिर, श्री रोकडोबा मंदिर, श्री त्र्यंबकेश्वर व खंडोबा मंदिर, श्री नरसोबा मंदिर, श्री पुंडलिक मंदिरासमोरील समाधी आणि श्री काळा मारुती मंदिराचा समावेश आहे. याबरोबरच विद्युत व्यवस्थापन (आधीची विद्युत प्रणाली बदलून नवीन प्रणाली बसविणे, आपत्कालिन विद्युत पुरवठा, वायुवीजन तसेच आतील व बाहेरील भागातील दररोजची व उत्सवी प्रकाश योजना) साठी ५ कोटी ६७ लाख ११ हजार ९८० रुपये, जल व्यवस्थापनासाठी (पिण्याच्या तसेच वापराच्या पाण्याची व्यवस्था तसेच सांडपाणी आणि पावसाच्या पाण्याची निचरा व्यवस्था) १ कोटी ५४ लाख ८ हजार, अभ्यागत सुविधेसाठी ६ कोटी ६८ लाख ९८ हजार ८७७ रुपये आणि मंदिरालगतच्या रस्त्याची दगडी फरसबंदी आणि सौंदर्यीकरण यासाठी ४ कोटी २० लाख ७२ हजार ९६० रुपयांचा समावेश आहे. तर जीएसटी सह अन्य करांसाठी २० कोटी ३३ लाख ८१ हजाराची तरतूद केली आहे.

बकरी ईदसाठी अधिकृत कत्तलखान्याचा वापर करा : निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार

सोलापूर/प्रतिनिधीः यावर्षी आषाढी एकादशी आणि बकरी ईद हे सण एकाच दिवशी म्हणजे २९ जून २०२३ रोजी आहेत. दोन्ही सणांच्या पार्श्वभूमिवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी मुस्लिम बंधुंनी कुर्बानीसाठी अधिकृत कत्तलखान्याचा वापर करावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी आज येथे केले.

बकरी ईद समन्वय समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात झालेल्या या बैठकीस महानगरपालिका उपायुक्त मच्छिंद्र घोलप, पोलीस उपायुक्त डॉ. दीपाली काळे, पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले, अन्न व औषध प्रशासनचे सहायक आयुक्त प्रदीप राऊत, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. समीर बोरकर, पशुधन विकास अधिकारी डॉ. धनाजी गिड्डे, मोटार वाहन निरीक्षक शिवाजी सोनटक्के तसेच संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार म्हणाल्या, उच्च न्यायालयाने अधिकृत कत्तलखान्याव्यतिरिक्त पशुंची कत्तल करू नये, असे निर्देश दिले आहेत. त्याप्रमाणे सर्वांनी पालन करावे. महापालिका, नगरपालिका क्षेत्रात उघड्यावर कुर्बानी होणार नाही, याची दक्षता घ्यावी. जिल्ह्यातील नागरिकांनी २९ जून २०२३ रोजी घरगुती पद्धतीने ईद साजरी करून कोणाच्याही धार्मिक भावना दुखावणार नाहीत, याची काळजी घेण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी स्थानिक प्रशासन, पोलीस, परिवहन, पशुसंवर्धन विभागांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

यावेळी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. समीर बोरकर यांनी स्वागत केले. तसेच पशुधन विकास अधिकारी डॉ. धनाजी गिड्डे यांनी पशुसंवर्धन विभागाच्या बकरी ईद बाबतच्या मार्गदर्शक सूचनांची माहिती दिली.

अधिकृत कत्तलखाना म्हणून अपेडा मान्यताप्राप्त खाजगी कत्तलखाना मुळेगाव तांडा ता. दक्षिण सोलापूर येथील मे. सोनअंकुर एक्स. प्रा. लि. हा घोषित केलेला आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली शिक्षण कार्यगटाच्या प्रतिनिधींची भेट

सांस्कृतिक कार्यक्रमात विविधरंगी भारताचे पाहुण्यांना दर्शन

पुणे : जी-२० शिक्षण कार्यगटाच्या चौथ्या बैठकीसाठी आलेले सदस्य देशांचे मंत्री आणि प्रतिनिधींची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेतली आणि त्यांच्याशी संवाद साधला. पाहुण्यांच्या सन्मानार्थ आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात सादर करण्यात आलेल्या नृत्यांच्या माध्यमातून विविधरंगी भारताचे दर्शन घडले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे जी-२० प्रतिनिधींसाठी महाराष्ट्र शासनाच्यावतीने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, आमदार माधुरी मिसाळ, केंद्रीय शालेय शिक्षण सचिव संजय कुमार, उच्च शिक्षण सचिव के.संजय मूर्ती, विभागीय आयुक्त सौरभ राव, पुणे महानगरपालिका आयुक्त विक्रम कुमार, जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख, कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी आदी उपस्थित होते.

स्वागताच्यावेळी करण्यात आलेल्या मल्लखांब प्रात्यक्षिकांनी पाहुण्यांची मने जिंकली. मर्दानी खेळ आणि लोककलांचेही यावेळी सादरीकरण करण्यात आले.

सांस्कृतिक कार्यक्रमातून भारताच्या सांस्कृतिक वैभवाचे दर्शन

भारताच्या विविध प्रांतातील लोकनृत्य यावेळी सादर करण्यात आले. त्यातून विविधरंगी भारतीय संस्कृती आणि सांस्कृतिक वैभवाचे दर्शन पाहुण्यांना घडले. बांबू नृत्य, ढोल नृत्य, दीप नृत्य, घुमर नृत्य, गरबा नृत्य, पंजाबी भांगडा, नागालँडचे लोकनृत्य, मध्यप्रदेशचे लोकनृत्य, महाराष्ट्राचे कोळी आणि लावणी नृत्य, कथ्थक आदी नृत्यप्रकार यावेळी सादर करण्यात आले. 'कलर्स ऑफ इंडिया' या संकल्पनेखाली कार्यक्रमाच्या शेवटी 'वंदे मातरम' या गीतावर सादर करण्यात आलेल्या भारतीय लोकनृत्यांच्या सप्तरंगी दर्शनाने उपस्थित प्रतिनिधी मोहित झाले. कार्यक्रम झाल्यावर काही पाहुण्यांनी स्वतः लेझीम, फुगडीचा आनंद घेतला.कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

सांगवी बु.येथे शासन आपल्या दारी उपक्रम संपन्न

अक्कलकोट/प्रतिनिधीः सांगवी बु येथे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सरपंच मेजर बाळासाहेब भोसले यांच्या पुढाकाराने शासन आपल्या दारीं या उपक्रमा अंतर्गत शासनाच्या श्रावणबाळ योजना नवीन नोंदणी आणि नूतनीकरण, उत्पन्न दाखला यासारख्या विविध योजनांचा लाभ ग्रामस्थानी घेतला शासनाच्या बऱ्याच योजनांची लागणारी कागदपत्रे एकाच छताखाली मिळाल्यामुळे ग्रामस्थ विशेषतः वयोवृद्ध पुरुष आणि महिला खुप खूष झाल्या यासाठी ग्रामसेविका सौ शैलजा पोमाजी मॅडम,तलाठी श्री घाटे साहेब, कोतवाल जाकीर कागदे आणि श्री स्वामी समर्थ महा ई सेवा केंद्राचे श्री कृष्णा यादव, सौ सोनाली यादव, आणि श्री अमोल कोळी या सर्वांचे मोलाचे योगदान लाभले

या प्रसंगी मेजर बाळासाहेब भोसले यांनी राबविलेल्या या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे ग्रामस्थाकडून खुप कौतुक होत आहे. या प्रसंगी मेजर भोसले यांनी असेच नवीन आणि लोकांच्या सोयीचे आणि फायद्याचे उपक्रम राबविण्याचा मानस बोलून दाखविला या वेळी मेजर बाळासाहेब भोसले, माजी सरपंच अबूबकर शेख,उपसरपंच लक्ष्मण डांगे, ग्रामपंचायत सदस्य सुभाष सोनकांबळे, प्रदीप सलबत्ते, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष इरफान शेख, उपाध्यक्ष प्रताप भोसले, राजु भोसले, हनिप शेख, अमोल भोसले, श्रीपती भोसले, बळवंत(बबलू) भोसले, अक्षय जाधव, राम आवटे, मौला चाबुकस्वार आणि गावातील महिला आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत कर्मचारी वशिम शेख, जावेद मुल्ला, राजु खरात यांनी खुप मदत केली

विधान परिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

पंढरपूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र राज्याच्या विधान परिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे यांनी आज श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, प्रांताधिकारी गजानन गुरव, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपविभागीय पोलीस

अधिकारी अर्जुन भोसले, मुख्याधिकारी अरविंद माळी, मंदिर समितीचे सदस्य संभाजी शिंदे, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड तसेच मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी उपसभापती निलम गोऱ्हे यांनी आषाढी यात्रा कालावधीत मंदीर समितीकडून भाविकांसाठी देण्यात येणाऱ्या सुविधांची. तसेच वारी कालावधीत मंदिर समिती मार्फत करण्यात आलेले नियोजनाबाबत माहिती घेवून आवश्यकत्या सूचना दिल्या.

आरोप प्रत्यारोप अन् काच फोडूनही विठ्ठलच्या वतीने केला नेत्यांचा सन्मान

अभिजीत पाटील यांनी जपली परिवाराची संस्कृती

पंढरपूर/प्रतिनिधीः सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणूक नुकतीच पार पडली .यामध्ये काळे गटाला यश प्राप्त झाल्यानंतर कर्मवीर औदुंबरआण्णा पाटील यांच्या पुतळ्यास श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना येथे,मंगळवारी सहकार शिरोमणी चे चेअरमन कल्याणराव काळे ,भगीरथ भालके, युवराज पाटील, समाधान काळे, गणेश पाटील यांनी येऊन कारखाना स्थळावर येऊन अभिवादन केले. यावेळी हीच परंपरा आणि संस्कृती जपत विठ्ठलचे चेअरमन अभिजीत पाटील यांच्या वतीने यथोचित सन्मान करून आपल्या परिवाराची संस्कृती जपली आहे.

ही निवडणूक विठ्ठल परिवार अंतर्गत होती. या पार पडलेल्या निवडणुकीत एकमेकावर आरोप प्रत्यारोप मोठ्या प्रमाणात झाले. एवढेच नव्हे तर विजयी झालेल्या काळे गटाच्या समर्थक यांनी निवडणुकीतील मतमोजणी दिवशी चेअरमन अभिजीत पाटील यांच्या गाडीची काच फोडली होती. याबाबतचा कोणताही रोष मनात न बाळगता आपल्या परिवारातील संस्कृतीला कुठेही डाग न लागता, अभिजीत पाटील यांनी या आलेल्या विठ्ठल परिवारातील नेत्यांचा नेत्यांचा सत्कार केला. हीच राजकारणाची परंपरा आणि सुसंस्कृतपणा अभिजीत पाटील यांनी जपलेला आहे.चेअरमन अभिजीत पाटील बाहेरगावी असल्याने ते स्वतः उपस्थित नव्हते. मात्र त्यांच्या आदेशाने हा सन्मान करण्यात आला आहे. हा सत्कार संचालक मंडळ व कारखान्याचे कार्यकारी संचालक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

नांदेड येथील बोंढार हवेली या गावातील आरोपींना फाशीची शिक्षा द्या : सुहास बनसोडे

पुणे/प्रतिनीधी : नांदेड जिल्ह्यातील बोंढार हवेली गावामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केल्याचा राग मनात धरून,अक्षय श्रावण भालेराव याचा खून केल्याच्या निषेधार्थ रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आय) महाराष्ट्र राज्याच्या वतीने दिनांक २१/०६/२०२३ रोजी आझाद मैदान मुंबई येथे एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.यावेळी अप्पर सचिव गृह विभाग यांना निवेदन देण्यात आले.निवेदनामध्ये अक्षय भालेराव याच्या मारेकर्याला फाशीची शिक्षा देण्यात यावी,अक्षय भालेराव यांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री यांनी भेट देऊन त्यांना आर्थिक मदत करावी,अक्षय भालेराव यांच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय सेवेत समावेश करावे,अक्षय भालेराव यांच्या खुनातील ११ आरोपींची नार्को टेस्ट करावी,अक्षय भालेराव यांचा खुनाचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्यात यावा.या मागण्या केल्या आहेत.सदर आंदोलन रिपब्लिकन पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुहास बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.यावेळी राष्ट्रीय नेते सतीश गायकवाड,श्रावण वाघमारे उपस्थित होते.

मा.आमदार डॉ.विनय कोरे यांच्या हस्ते जागतिक विक्रमवीर कु.अन्वी घाटगे हिचा सत्कार

पत्रकार नामदेव निर्मळे

कोल्हापूरची सर्वात लहान गिर्यारोहक, कोल्हापूरची शान, वयाच्या तिसऱ्या वर्षी महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर कळसुबाई शिखर सर करून सर्वांना आश्चर्यचकित केले होते. याची दखल तिची अशिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये सुद्धा नाव नोंद झाले. कोल्हापूरचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी मा. राहुल रेखावार साहेब यांनी सुद्धा अन्वीला प्रशस्तीपत्र देऊन तिचा सन्मान केला होता.

खोची येथील कार्यक्रमात अन्वीचा सन्मान मा. आमदार विजय कोरे साहेब यांच्या हस्ते करण्यात आला. व तिला भरपूर शुभेच्छा देण्यात आल्या. मुलगी बरोबर तिची आई व प्रशिक्षक अनिता घाटगे यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला.यावेळी उपस्थितीत विनोद शिंगे सर, दलितमित्र व माजी जिल्हा परिषद सदस्य अशोकराव माने, वसंत गुरव व मान्यवर उपस्थित होते. सर्वांची कौतुकाची बाब ठरली.